(Marathi)

१०५
९।२१

1329 11 P

D Prabhat Pheri 1.

Prabhat Pheri Pt I.

मराठी, अनेक कवींची राष्ट्रीय काव्य माला

in Marathi

# प्रभात फेरी

(2 copies)

1329

## भाग १ ला.



पी. बी. पाठक, महात्मा एजन्सी,

ठाकूरद्वार नाका, सूर्यमहाल मुंबई नं. ४.

किंमत १ आणा.

1329
Mar

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 1329
Date 11.1.72
GOVT. OF INDIA

IMPERIAL RECORD
RECEIVED
21 NOV. 1930
DEPARTMENT

# प्रभात फेरी संग्रह. भाग १ ला,



## वंदन-मोरया ! उठ-

प्रथम वंदना, करूं गजानना ॥
संकटें हराया, भरतभू तरावया ॥
पारतंत्र्य छेदना, स्वहित रक्षणा ॥ प्रथम०
देशभक्तिचा झरा, वाहतो मनीं खरा, ॥
एक हृदयीं वासना, स्वराज्य स्थापना ॥ प्रथम०
असहकार मंत्र हा, नित्य जपत तो रहा ॥
हिन्दुची पुरातना, शुद्ध भावना ॥ प्रथम०
गांधीजी कथीतसे, मार्ग हो दुजा नसे ॥
यश कुणास येतना, चळवळी विना ॥ प्रथम०
बहिष्कार एक आंग, आचरा स्वदेशि सांगा ॥
हीच हृदय शोभना, राष्ट्र भावना ॥ प्रथम०

# स्वदेशी जनाचे श्लोक

स्मरा हो स्मरा धन्य ते लोकमान्य ॥ तयाचे जरी शब्द तुह्मांस मान्य ॥ स्वदेशी व्रताचा करा अंगिकार ॥ बहिष्कार हें सत्य स्वातंत्र्य सार ॥ १ ॥ असहकार हा एकची मंत्र आहे ॥ महात्मा मुनी गांधिजी सांगताहे ॥ हे हिन्द संतान हो आज जागा ॥ तया मंत्रुनी आपुले जागा ॥ २ ॥ बहिस्कार ही पर्वणी येत मोठी ॥ स्वदेशी वर्ग वांचवा साठ कोटी ॥ स्वयें वापरा वस्त्र खादी स्वदेशी ॥ द्या पुण्य होळीस वस्त्रें विदेशी ॥ ३ ॥ न वाटे जाळणें योग्य गोष्टी ॥ तरी वस्त्र द्या आज दुष्काळ भेटी ॥ विदेशी त्यजोनी वरा खादी–दिक्षा ॥ ही देशभक्तांस द्या आज भिक्षा ॥ ४ ॥ पहा चालली लक्षुमी भारताची ॥ मनाला न कां वाटते खंत याची ॥ किती राहती लोक हो अर्ध–पोटीं ॥ स्वदेशी बरा वांचवा साठ कोटी ॥ ५ ॥ जय जय रघुवीर समर्थ ।

## भजन

रघुपति राघव राजाराम । पतित पावन सिताराम
जानकि जीवन रामनाम । सुंदर माधव मेघःशाम

# आपलें कर्तव्य

[ चाल—हा नारायण अडला. ]

जय जय विद्यावंद्य गणराज, जयजय टिळक गांधिमहाराज ॥ धृ० ॥
स्वराज्य मिळण्या दस लखांचें तत्व सांगतो आजीं ॥
सर्वस्वाची करि बा, होळी स्वराज्यकुंडामाजीं ॥ १ ॥
ईश्वर व्हाया, निर्जिव फत्तर घाव टाकिचे साही ॥
वृतिच्छेदा भिऊनि बापा, स्वराज्य मिळणें नाहीं ॥ २ ॥
शिवरायानें राज्य स्थापिलें तृणवद्देहा गणिलें ॥
तन-मन-धन हें अर्पुनि राष्ट्रा उच्चपदाला नेलें ॥ ३ ॥
राष्ट्रसभेनें निश्चित केला कार्यक्रम बहु नामी ॥
पार पाडणें प्राप्त असे बा ठेऊनि निष्ठा रामीं ॥ ४ ॥
असहयोग ही जालिम मात्रा दास्य हरवा देई ॥
गांधी महात्मा, कुशल भिषग्वर, निष्फल कधिं नच होई ॥ ५ ॥
स्वदेशभक्ता महाराष्ट्रिया, ठिळघसखा हा गांधी ॥
देह भिन्न परी आत्मा एकचि, ध्यानिं धरी हें आधीं ॥ ६ ॥
शुद्ध स्वदेशी, बहिष्कारातें योजुनि विजटप्राप्ती ॥
होऊं करोनि सत्य—आग्रहा हीच गणेश विनती ॥ ७ ॥

# सत्यसमाज विनंति

पद—चाल ( हमारा राम प्यारा )

मराठे भाइहो ऐका विचारें पाउलें टाका ॥
असे ही वेळ बाणीची, तयाची जागृति राखा ॥ धृ०
निघालां सत्य शोधाया, छत्रासें शीणता वायां ।
कसोटी आत्मउपमेची, स्वतांच्या अंतरीं देखा ॥ १ ॥
द्विजांना वा महारांना, गुणावरि आंगच्या माना ।
गुणागुण व्यक्तिचे देखा, न दावा जातिशी हेका ॥ २ ॥
शिवाजी क्षत्रियांमाजी, तसा तानाजि संताजी ।
प्रभूंही जाहला बाजी, कृतीनें वंद्य त्रयलोकां ॥ ३ ॥
तुकोबा जातिचा वाणी, प्रभुला भुतलीं आणी ।
अशा त्या भक्तवर्याचे, धराया पाय भीती कां ॥ ४ ॥
जरी त्या चर्मकारातें, कराया स्पर्श मन खातें ।
तरी त्या रोहिदासाला, नमाया कोण घे शंका ॥ ५ ॥
समाजीं अंत्यजांलागीं, बघवितां खालच्या जागीं ।
तथापी पूजिती सारे, महात्मा संत तो चोखा ॥ ६ ॥
पुराणीं म्लेंच्छ भाईना, गणीलें वर्ज्य सन्माना ॥ ७ ॥

परी साधू कबीराचा, त्रिलोकीं वांचतो डंका ।
स्वराज्य स्तंभ बांधाया, प्रजेचें ऐक्य हा पाया ।
परी हा घात सत्तेचा, रुचेना नोकरां लोकां ॥ ८ ॥
तयारी भेदयज्ञाची, जहाली लोकमान्यांची ।
तयाला तीन धूर्तांनी, असे हा आणिला धोका ॥ ९ ॥
कुणी हिंदू मुसलमानीं, मराठे ब्राह्मणीं कोणी ।
भ्रमाच्या दाउनी भेदा, स्वताचा राखिती तनखा ॥ १० ॥
स्वराज्या आधिं घेऊं या, करूं मग खासगी न्यायां ।
स्वदेशा मानुनी चोला, जणों ही भंगली नौका ॥ ११ ॥

## भजन

राधा कृष्ण जय कुंजविहारी । मुरलीधर गोवर्धन धारी ॥

## सत्याग्रह

आह्मि वीर स्वातंत्र्याचे आतां निर्भय मन बनलों ।
खुशालआणा बंदुक तोफा तुमच्या तलवारी । आतां निर्भय०
जुलमाचे हे स्वैर कायदे मान्य आम्हा नाहीं ।
मरण पुरवलें परी गुलामी सहन होत नाहीं । आतां निर्भय०

स्वराज्य अमुचा हक्क आह्मी हा प्राप्त करुनि घेऊं ।
कृत निश्चय हा झाला आता जिवां जीव देऊं । आतां निर्भय०
दाउं नका हो भीति आह्माला तुमच्या तुरुंगाची ।
श्रीकृष्णाचें जन्म—स्थान हें प्रीति आह्मा याची । आतां निर्भय०
शांतीची ही असहकारिता हिनें जगा जिंकु ।
मारणें आह्मां ठाऊक नाहीं मरणा आलिंगूं । आतां निर्भय०

## कॉंग्रेस कायदे भंग

### पद ( चाल २ मुखाचा शोध )

कायदे भंग करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
झुलमी कायदे आतां । बंधूनो मोडण्या करितां ॥
उठाहो स्वस्त कां बसलां । चला व्हा तयार मरण्याला ॥
असे हे कृत्य करितांना । येईल चीड ब्रिटिशाना ॥
त्रास देतील आपणाला तरि व्हा तयार मरण्याला ॥
गोळीबार करतील । शेवटीं सुळी देतील ॥
तरी हो भिऊ नका त्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥
भ्याड हो उठा लवलाही । मनाची लाज धरा कांहीं ॥
असे का आळशी बनला । चला व्हा तयार मरण्याला ॥
विनवी कवि शंकर । बंधुनो बांधा कंबर ॥
आंग्लाई नष्ट करण्याला । चला व्हा तयार मरण्याला ॥

( चाल—थोर तुझे उपकार )

करा कायदे भंग जनहो । करा कायदे भंग ॥ धृ० ॥

रण संग्राम मधें जावया । बांधा चंग ॥ १ ॥ जनहो ॥

ब्रिटिशांचे खरें खरेंते । काढूं बाहेर व्यंग ॥ २ ॥ जनहो ॥

किती आजवरी आपणा वरती । केले यांनी ढंग ॥ ३ ॥ जनहो ॥

आपल्या पैशावरी घडोघडी । करीताती नवरंग ॥ ४ ॥ जनहो ॥

तरीं सोडा याच घडीला । ब्रिटीशांचा संग ॥ ५ ॥ जनहो ॥

उठा बंधुनो सरकाराला । करून सोडूं दंग ॥ ६ ॥ जनहो ॥

शंकर कवि ह्मणे या कार्यास्तव । बांधा कंबर तंग ॥ ७ ॥ जनहो ॥

# भविष्य

स्वतंत्रता मिळणार आतां । स्वतंत्रता मिळणार ॥ धृं० ॥

आपणा सर्वावरचें आतां । पारतंत्र्य जाणार । १ । आतां

परदाशाश्याची बेडी आतां । खात्रीनें तुटणार । २ । आतां

इंग्रजशाही पहा बंधुनो । खास आतां बुडणार । ३ । आतां

तुरुंगांतील सर्व पुढारी । लौकरच सुटणार । ४ । आतां

महात्माजींच्या चळवळीचा । होईल जयजयकार । ५ । आतां

जिकडे तिकडे ब्रिटीशावर । बहिष्कार पडणार । ६ । आतां

खरा कायेदभंग कृतीनें । स्त्रिहाच हो करणार । ७ । आतां

शंकर कविचे बोल बंधुनो । खरेच हो ठरणार । ८ । आतां

# प्रार्थना

हेंचि दान देगा देवा, तुझा विसर न व्हावा !
आह्मि देऊं आमुचे प्राण माय देशासाठीं जाण !
आम्हा नाहीं भय आता, तुरुंगाच्या बोला वार्ता !
बंदुकीची जड गोळी, आह्मांपुढें दीन झाली !
नाहीं अत्याचार ठावा, आम्हा वर हाचि धावा !
करूं असहकारिता, गोड लागो हेंचि चित्ता !
त्यागुं विदेशी कापड, उडो नेत्रींचीं झांपड !
आम्हि फिरवूं चरका देवो हाचि आम्हा रुका !
आम्हा नको तीं कौन्सिलें, नोकरशाहीचें बाहुलें !
नको आम्हा कॉलेज कोर्टे, आमुचें मन त्यांस विटे !
दूर व्हावी अस्पृश्यता, आम्हां—मधुनि तत्वतां !
नाथ मनी लागे ध्यास, देवा पुरवावी आस !

❀ समाप्त ❀

अनेक कवींनीं छापलेल्या पुस्तकांतील संग्राहक मुद्रक व प्रकाशक
पी. बी. पाठक, श्री पांडुरंग वैभव प्रेस, मुंबई नं. ४ सन १९२०